मसुदा
क्र. ९/२०१५-१६

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा ***सोमवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता*** वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख (कुलगुरू)

२. श्री सिध्दार्थ खरात (उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

३. श्री. शैलेंद्र देवळणकर (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, परीक्षा नियंत्रक हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

➢ अभिनंदन -

मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर श्री. सुभाष महाजने यांचे विद्यापीठातर्फे व व्यवस्थापन परिषदेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

➢ श्रध्दांजली -

**श्री. भवरलाल जैन**

जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष आणि ठिबक सिंचनाचे प्रणेते पद्मश्री भवरलाल जैन यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षाचे होते.

बाब १: दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.

बाब २: मुंबई विद्यापीठाचे सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा आणि सन २०१५-१६ चा सुधारित अर्थसंकल्पिय अंदाज व्यवस्थापन परिषदेच्या स्वीकृतीसाठी व अधिसभेच्या शिफारशीसाठी सादर

ठराव : चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क्र. ६ च्या शिफारशीनुसार विद्यापीठाने सन २०१५-१६ चा सुधारित अर्थसंकल्पिय अंदाज व सन २०१६-१७ चा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या सूचनासहित मान्य करण्यात आला व अर्थसंकल्प मंजूरीसाठी अधिसभेला शिफारस करण्यात आली.

अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मा.कुलगुरूनी सादर करावा असा ठराव करण्यात आला.

**आयत्यावेळी अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात आलेल्या बाबी :-**

बाब ३: परीक्षा विभागातील संबंधीत VCD NO.Exam/Photo & Rev./Univ. VCD/4637 of 2010 मधील मुद्द्यांचे परिनियम (Regulations) मध्ये रूपांतर करण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, परीक्षा विभागातील संबंधीत VCD NO.Exam/Photo & Rev./Univ.VCD/4637 of 2010 मधील मुद्द्यांचे परिनियमांमध्ये (Regulations) रूपांतर करण्यासाठी समिती नेमण्यात आली.

पुढे असा ठराव करण्यात आला की, सदर समिती स्थापन करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना देण्यात यावेत.

बाब ४: परीक्षा मंडळाच्या दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

असा ठराव करण्यात आला की, सदर परीक्षा मंडळाचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

---

मान्यतेसाठी

| कुलगुरू | कुलसचिव | संचालक (बी.सी.यु.डी.) | उपकुलसचिव (प्राधिकरणे) |
|---|---|---|---|